(२४) अपंग

IMP

(38)

# मुंबई विद्यापीठ

कविक/ १८ /२००३

दिनांक : २९ जानेवारी २००३

**परिपत्रक :**

प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तत्सम महाविद्यालये / संस्था, तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग, शिक्षक नियुक्ती विभाग व उपकुलसचिव संलग्नता विभाग यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रभारी कुलसचिवांकरिता

---

अपंग व्यक्तिंना शासकीय सेवेतील गट अ ते गट ड मधील पदांवर सरळसेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात क्रमवार बिंदु नामावली व कार्यपध्दती विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क : एसआरव्ही -१०९९/प्रक३७/९९/१६-अ

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : ४ मार्च, २००२

संदर्भ : १) शासन परिपत्रक, सा. प्र. वि. क. : एसआरव्ही -१०९७/प्र. क.१२ /९७/१६-अ, दिनांक २ मे, १९९८

२) केंद्रशासनाचे क, ३६०३५/१६/९१- Estt(SCT) दिनांक १८/२/१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन

३) केंद्रशासनाचे क, ३६०२५/०३/९७- Estt(Res) दिनांक ४/७/१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन

४) शासन परिपत्रक, सा. प्र. वि. क. : एसआरव्ही -१०९७/प्र क ३१ /९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९

**शासन परिपत्रक**

अपंग व्यक्ति ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ च्या कलम ३२ व ३३ नुसार, अपंग व्यक्तींसाठी गट अ ते गट-ड मधील नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदांवर ( Identified Posts ) सरळसेवा भरतीमध्ये १) अंध / अल्पदृष्टी ( दृष्टीक्षीणता ) - १% ; २) कर्णबधीर १%, आणि ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती १% असे एकूण ३% आरक्षण ठेवण्याची कार्यपध्दती या विभागाच्या दिनांक २ मे, १९९८ च्या शासन परिपत्रकात विहित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाने विभागांतर्गत आणि विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या विविध शासकीय कार्यालयामधील गट अ ते गट ड मधील प्रत्येक संवर्गातील कामाच्या स्वरुपाचे काळजीपुर्वक परिशीलन करुन अपंग व्यक्तींसाठी सरळसेवा भरतीत रिक्त पदांवर ३% आरक्षण विहित करणे आवश्यक आहे

२. केंद्रशासनाने त्यांच्या दिनांक १८ फेब्रुवारी, १९९७ आणि दिनांक ४ जुलै, १९९७ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंग व्यक्तींची गट अ व गट ब मधील पदांवर सरळ सेवेने भरती करतांना १०० रिक्त पदांची स्वतंत्र नोंदणी ठेवून त्यामधील १,३४ व ६७ या क्रमानुसार येणारी रिक्त पदे राखून ठेवण्याच्या सूचना देऊन त्याबाबतची कार्यपध्दती विहित केली आहे. राज्य शासकीय / निमशासकीय सेवेत गट अ ते गट ड मधील नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) अपंगांची सरळ सेवेने नियुक्ती करतांना केंद्रशासनाने विहित केलेली क्रमवार बिंदुनामावली व कार्यपध्दती स्वीकारण्याचे शासनाने ठरविले आहे त्यानुसार खालील सूचना देण्यात येत आहेत.

३. राज्य शासनाच्या सेवेतील गट अ ते गट ड मधील अपंग व्यक्तींसाठी योग्य ठरविलेल्या पदावर (Identified Posts) सरळ सेवेने नियुक्ती करतांना प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी अपंगासाठी ठेवण्यात आलेले आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी योग्य ठरविण्यात आलेल्या व सरळ सेवेने भरण्यात यावयाच्या प्रत्येक पदासाठी १०० बिंदुंची [स्वतंत्र- नोंदवही] (Register) ठेवून त्यामधील १,३४ व ६७ या क्रमाने येणारी रिक्त पदे अपंगासाठी राखून ठेवावीत. याकरीता विभाग प्रमुखांनी नोंदवहितील क्रमांक १ पासून सुरुवात करून कोणत्याही एक अपंग प्रवर्गातील उमेदवाराचा विचार करावा. मात्र असे करताना नियुक्तीस योग्य ठरविलेले पद (Identified Posts) एकापेक्षा अनेक अपंग प्रवर्गाकरिता योग्य ठरविलेले असेल तर आरक्षण ठेवताना ते १) अंध / अल्पदृष्टी ( दृष्टीक्षीणता ) २) कर्णबधीर आणि ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती या क्रमाने आळीपाळीने (By Rotation) आरक्षित राहील याची खातरजमा करावी त्यानंतर या विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १६ ३ १९९९ मधील कार्यपध्दतीनुसार मागणीपत्र पाठवावे अशाप्रकारे निवड झालेल्या अपंग उमेदवारास सध्या चालू असलेल्या १०० बिंदु नामावली (Roster) त्याच्या प्रवर्गानुसार मागासवर्गीय ( उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती ई) / खुला प्रवर्ग यानुसार दर्शविण्यात याव. प्रस्तावित क्रमवार बिंदुनुसार तसेच सामाजिक आरक्षण / खुला प्रवर्ग याप्रमाणे मागणी केलेल्या अपंग प्रवर्गाचा उमेदवार त्या भरती वर्षात उपलब्ध न झाल्यास अपंग व्यक्ति (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संवरक्षण ) अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार कार्यवाही करावी.

४. हे आदेश शासकीय / निमशासकीय सर्व शासकीय मंडळे / महामंडळे स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानित संस्था यांना लागू होतील.